# जाहीर प्रसिध्द बारदाना ई-निविदा सूचना

जा.क्र.पुरवठा/बारदान विल्हेवाट/कावि-९५/२०१८
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दि. ०९/०२/२०१८.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचेकरीता व त्यांचे वतीने जिल्हाधिकारी ठाणे यांचे कडून ठाणे जिल्हयातील जिल्हा पुरवठा अधिकारी ठाणे यांचे कार्यक्षेत्रातील शासकीय गोदामातील उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदान्याची खुली विक्री **जसे आहे व जेथे आहे** या तत्त्वावर विक्री करण्यासाठी ई-निवीदा मागविण्यात येत आहेत. गोदामात उपलब्ध असलेल्या दि.१ एप्रिल २००७ ते दि.३१ मार्च २०१७ या कालावधीतील रिक्त बारदान गोदामनिहाय खालीलप्रमाणे शिल्लक आहे.

| अ.क्र. | गोदाम | उपयोगी बारदाने | | | निरुपयोगी बारदाने | | | तुकडा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १०० कि. | ७५ कि. | ५० कि. | १०० कि. | ७५ कि. | ५० कि. | |
| १ | भिवंडी | - | - | ३५०० | १०१ | - | ३१४७२ | २५११ |
| २ | शहापूर | - | - | २००० | - | - | ३७१९५ | २१२९ |
| ३ | मुरबाड | - | - | २८९० | - | - | ३२७५६ | ५५३२ |
| ४ | कल्याण | - | - | ३५०५ | - | - | ६७४९ | - |
| ५ | अंबरनाथ | - | - | २९५० | - | - | ८४९१ | - |
| | एकुण | - | - | १४८४५ | १०१ | - | १२४६६३ | १०९८० |

स्थानिक बाजारातील बारदाना विक्री दर विचारात घेऊन खालीलप्रमाणे उक्त शिल्लक बारदानाची हातची किंमत (Upset Price) निश्चित करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | उपयोगी बारदान प्रति नगाचा दर रु. | निरुपयोगी बारदान प्रति नगाचा दर रु. | | तुकडा बारदान प्रति नगाचा दर |
|---|---|---|---|---|
| | ५० किलो क्षमता | ५० किलो क्षमता | १०० किलो क्षमता | |
| हातची किंमत | ७.४० | ३.०० | ५.०० | ०.३६ |

वरील सरासरी दरानूसार विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या बारदान्याची किंमत खालीलप्रमाणे

| अ.क्र. | उपयोगी बारदान प्रति नगाचा दर रु. | निरुपयोगी बारदान प्रति नगाचा दर रु. | | तुकडा बारदान प्रति नगाचा दर |
|---|---|---|---|---|
| | ५० किलो | ५० किलो | १०० किलो | |
| एकुण बारदाना | १४८४५ | १२४६६२ | १०१ | १०८९० |
| हातची किंमत | ७.४० | ३.०० | ५.०० | ०.३६ रु. |
| एकुण रक्कम | १०९८५३/- | ३७३९८९/- | ५०५/- | ३९२०/- |
| एकुण रक्कम रुपये | | | ४८८२६७/- | |

D:\TABLE NO 4\BARDAN TENDER 2015

बारदान विक्रीसाठी ई- निविदा वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | बारदाना जाहीर ई- निविदा प्रसिध्द करणे | दि. १६/०२/२०१८ सकाळी ११.०० वाजता |
| २ | ई- निविदा डाऊनलोड करण्याचे संकेतस्थळ | **www.mahatenders.gov.in** व ***www.thane.nic.in*** |
| ३ | ई-निविदा डाऊनलोड करणे व भरणे | दि.१६/०२/२०१८ सकाळी ११.०० वा. पासून दि.०३/०३/२०१८ सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत |
| ४ | ई-निविदा भरुन सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.०३/०३/२०१८ सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत |
| ५ | ई- निविदा उघडणे | दि. ०७/०३/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे. |

तरी इच्छुक ई-निविदा धारकांनी Online पध्दतीने, संकेतस्थळ, www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा दिनांक १६/०२/२०१८ ते ०३/०३/२०१८ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत भरण्यात यावे. ई- निविदेचे वेळापत्रकात नमुद मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

मुदतीत प्राप्त झालेल्या ई-लिलाव निविदा दिनांक ०७/०३/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी ठाणे यांचे समक्ष किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकारी यांचे समोर online उघडण्यात येतील. याची ई-निविदा धारकांनी नोंद घ्यावी. निविदेतील अटी व शर्ती व इतर माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी ठाणे यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेतच पाहावयास मिळतील. सदरील ई-निविदा सुचनेत अंशत: बदल करणे अथवा रद्द करण्याचे पुर्ण अधिकार जिल्हाधिकारी ठाणे यांनी राखून ठेवले आहेत.

**उपसचिव, महाराष्ट्र शासन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र.गणिज १०९९/प्र.क्र.४७१०/ना.पु.२६-अ/ दि. १२ नोव्हेंबर १९९९**
**उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदानाच्या ई- निविदाच्या अटी व शर्ती**

१) उपयोगी, निरुपयोगी, तुकडा बारदाना हा जाहीर ई- निविदा सुचना मध्ये दर्शविलेल्या शासकीय गोदामातून जसे आहे व जेथे आहे या तत्त्वावर, तेथून स्वखर्चाने उचलावा लागेल. कोणत्याही परिस्थितीत बारदाना निवडून देता येणार नाही. बारदाना संबंधित शासकीय गोदामामध्ये कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल.

बारदानाची हातची किंमत (Upset Price) खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | बारदानाचा प्रकार सुतळीचा कॉटन | ५० किलो क्षमतेचा रिकामा बारदाना प्रति नग हाताची किंमत | १०० किलो क्षमतेचा रिकामा बारदाना प्रति नग हातची किंमत |
|---|---|---|---|
| १. | उपयोगी बारदाना प्रतीनग | ७.४० | -- |
| २. | निरुपयोगी बारदाना प्रती नग | ३.०० | ५.०० |
| ३ | तुकडा बारदाना प्रती नग | ०.३६ | -- |

२) ई- निविदेतील उपयोगी, निरुपयोगी, तुकडा बारदान्याचे दर प्रती बारदाना नग प्रमाणे स्वतंत्र नमुद करावे लागेल. (इसाऱ्याची रक्कम खालीलप्रमाणे आहे)

| अ.क्र. | बारदान्याच्या प्रकार | उपयोगी, निरुपयोगी, तुकडा, बारदानाच्या एकुण रक्कमेच्या १०% प्रमाणे होणारी इसाऱ्याची रक्कम |
|---|---|---|
| १ | उपयोगी बारदाना ५० किलो | १०९८५/- |
| २ | निरुपयोगी बारदाना ५० किलो | ३७३९९/- |
| ३ | निरुपयोगी बारदाना १०० किलो | ५१/- |
| ४ | तुकडा बारदानासाठी | ३९२/- |
| एकुण | | ४८८२७/- |

३) प्रत्येक ई- निविदा धारकास वरीलप्रमाणे बाबनिहाय स्वतंत्रपणे इसाऱ्याची रक्कम व ई-निविदा रक्कम रु.१०००/- online netbanking द्वारे भरणा करण्यात यावी व ती पावती तांत्रिक लिफाफा क्र.०१ मध्ये upload करावे.

४) ज्यांचे नावे ई- निविदा मंजूर होईल त्यास मंजूरी आदेश मिळाल्यापासून १० दिवसाचे आत करारनामा करुन द्यावा लागेल व संपूर्ण बारदान्याची रक्कम चलनाद्वारे करारनामा झाल्याच्या तारखेपासून १० दिवसापर्यंत जमा करावी लागेल, त्यानंतर बारदाना उचली बाबतचे आदेश देण्यात येतील व आदेश दिल्याच्या तारेखपासून ३० दिवसाचे आत संपूर्ण बारदाना उचलावा लागेल. मुदतीत बारदाना उचल न केल्यास भरणा केलेली बारदान्याची रक्कम परत मिळणार नाही. तसेच संदरहू बारदान्याचीच जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल व लिलावाद्वारे येणारी रक्कम पुर्वीपेक्षा कमी असेल तर अशा फरकाची रक्कम संबंधितांकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुल करण्यात येईल.

५) निविदाधारकांनी सादर करावयाची कागदपत्रे:-

<u>पाकीट क्रमांक १- (तांत्रिक लिफाफा)</u>

१) निविदा फी रु.१०००/- (अक्षरी एक हजार रुपये) जी रक्कम परत मिळणार नाही. निविदा सादर करताना निविदा फी रक्कम रु.१०००/- व इसारा फी रक्कम रु. ४८८२६/- (अक्षरी अठ्ठेचाळीस हजार आठशे सव्वीस मात्र) ही online payment/ Gateway/by net banking चा वापर करुन रक्कम भरण्यात यावी. Online तयार झालेली ई-निविदेची व इसारा रक्कम भरणा पावती लिफाफा क्र.०१ सोबत अपलोड करावी.

२) ई-निविदा मध्ये निविदाधारकाने स्वतःचे संपूर्ण नाव, पत्ता, दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक, पॅन कार्ड, आधार कार्ड क्रमांक, आयकर भरल्याचा दाखला इत्यादी माहिती सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये देण्यात यावी

३) ई-निविदाधारक वस्तू व सेवाकर (GST) कायद्याप्रमाणे नोंदणीकृत असावा.

४) निविदेतील सर्व अटी व शर्तींना बांधील आहे, असे अशा आशयाचे शपथपत्र प्रत्येक शपथपत्र रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोर /नोटरी करुन घेण्यात आलेले असावे. असे सर्व कागदपत्र दि. ०३/०३/२०१८ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपुर्वी सादर करावेत.

५) प्रत्येक तालुक्यासाठी एकच दर राहील. वेगळे दर स्विकारले जाणार नाही. तसेच एखादा बारदाना उपयोगी, निरुपयोगी, व तुकडा बारदाना आहे किंवा नाही हे ठरविण्याचे आधिकार संबंधित तहसिलदार यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतीम राहील.

<u>पाकीट क्रमांक २- दर पत्रकाचा फार्म (अर्थिक लिफाफा)</u>

६) प्रथम पाकीट क्रमांक १ उघडणेत येईल त्यात वरील कागदपत्रांची पुर्तता नसल्यास पाकीट क्र.०२ उघडणेत येणार नाही. व ती निविदा अपात्र ठरविली जाईल. निविदेत कमीत कमी ३ स्पर्धक असणे आवश्यक आहे.

७) आर्थीक लिफाफा क्र.०२ मध्ये आपले दर BOQ (bill of quantity) फाईल मध्ये भरुन लिफाफा क्र.०२ upload करावे.

८) ई-निविदा फॉर्म दिनांक १६/०२/२०१८ ते दि.०३/०३/२०१८ या कालावधीत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ई-निविदा सादर करण्याची अंतिम तारीख ०३/०३/२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा दि. ०७/०३/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी ठाणे यांचे समक्ष किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकारी यांचे समोर उघडण्यात येतील. याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

९) मंजूरी प्राप्त झाल्यानंतर निविदेतील दरास प्राप्त निविदाधारकास बारदाना उचलीचे आदेश देण्यात येतील. या बाबत विलंब झाल्याने बारदाना अधिक खराब झाल्यास त्यांच्या मंजूर दरात कपात केली जाणार नाही.

१०)उपयोगी, निरुपयोगी, बारदान्याची नग संख्या व तुकडा बारदानाचे नग संख्या व प्रत्येक गोदामनिहाय दर्शविलेली आहे , ती कमी /जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

११)निविदाधारकाने साठयाचा ताबा घेतल्यानंतर त्यामध्ये काही कमी जास्ती झाल्यास किंवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही. ५८

१२)बारदान्याची प्रत पाहून व निविदेच्या सर्व अटी याची खात्री करुन निविदा सादर करावी व निविदा उघडल्यांनतर अथवा मंजूर झाल्यानंतर बारदानासंबंधी कोणतीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

१३)हातची किंमत ही Basic price धरुन जो निविदाधारक एकुण बारदान्याची जास्त किंमत लावेल त्याचीच निविदा मान्य करण्यात येईल.

१४)एखाद्या ई-निविदाधारकांनी ई-निविदेत दर नमुद केले नसतील तर ती ई-निविदा स्वीकारली जाणार नाही. ई-निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अथवा मंजूर करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी ठाणे यांनी राखून ठेवला आहे.

१५) बारदानान्याची उचल विहीत मुदतीत न केल्यास उचलीसाठी लागणाऱ्या अतिरिक्त कालावधीस नियमानूसार गोदामभाडे भरावे लागेल.

१६) बारदाना मोजून देण्याची जबाबदारी संबंधीत गोदाम पालक/गोदाम व्यवस्थापक यांची आहे. तद्नंतरचा बारदाना उचलण्याचा संपुर्ण खर्च उदा.हमाली, चराई-भराई इत्यादी खरेदीदारास करावी लागेल.

१७) वित्तीय अधिकारानूसार जर निविदा मंजूरीची बाब ही आयुक्त अथवा शासनाच्या अधिकार क्षेत्रातील असल्यास किंवा इतर प्रशासकीय कारणाने आयुक्त/शासन स्तरावरुन निविदा मंजूरीस विलंब झाला व त्या दरम्यान बारदानाची पत खराब झाली तर पात्र निविदाकाराचे मंजूर दरात कपात केली जाणार नाही. निविदा मंजूर होईपर्यंत उपरोक्त कारणाने होणाऱ्या विलंबाने त्या दरम्यान बारदान्याची पत खराब झाली तर सदर जबाबदारी या कार्यालयाची तसेच शासनाची राहणार नाही.

१८)शासनाकडून निविदा मंजूरीच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर इतर निविदाधाकांची इसारा रक्कम परत करण्यात येईल. त्या रक्कमेवर कोणतेही व्याज देय राहणार नाही.

१९)खरेदीदाराचे digital Signature असणे बंधनकारक आहे.

स्वाक्षरी/-

जिल्हाधिकारी ठाणेकरिता

प्रतीलिपी:-

१) मा.प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय विस्तार मुंबई-४०००३२ यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

२) मा.अवर सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय विस्तार मुंबई-४०००३२ यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

३) मा.वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडे माहितीसाठी सादर.

४) मा.उप संचालक, नागरी पुरवठा यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

५) मा. उप आयुक्त (पुरवठा) कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कडे माहितीसाठी सविनय सादर.

६) जिल्हाधिकारी------------------ यांचेकडे प्रसिध्दीसाठी.

७) उप विभागीय अधिकारी ------------- यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.

८) तहसिलदार ------------

२/- इच्छुक निविदा धारकास दर्शविलेल्या शासकीय गोदामातील बारदाना साठा दाखविण्याची व्यवस्था करावी तसेच निविदेची प्रसिध्दी नोटीस बोर्डावर करुन प्रसिध्दीचा पंचनामा या कार्यालयास त्वरीत सादर करावा.

९) सर्व गोदामपालक यांना माहितीसाठी.

१०) प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणु,जव्हार,शहापुर यांचेकडे नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.

११) कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.

१२) निवडनस्ती.

जिल्हाधिकारी ठाणेकरिता

**स्थळ प्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.**

| अ.क्र. | परिशीष्ट अ | |
|---|---|---|
| १ | निविदाकाराचे संपुर्ण नाव | |
| २ | पत्ता | |
| ३ | दुरध्वनी क्रमांक | |
| ४ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ५ | पॅन.कार्ड क्रमांक | |
| ६ | आधार कार्ड क्रमांक | |
| ७ | आयकर भरला अगर कसा? भरला असल्यास त्याचा तपशील | |

निविदाधारकांची स्वाक्षरी